आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२१ फेब्रुवारी २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- अमेरिकेत सरसकट १० टक्के आयात शुल्क लागू करण्याचा अध्यक्ष ट्रंप यांचा अंतरिम आदेश जारी
- देशातून नक्षलवादाचं समूळ उच्चाटन येत्या ३१ मार्चपर्यंत करण्याचा केंद्रीय गृहमंत्र्यांचा पुनरुच्चार

- एआय इंपॅक्ट समिटमधे युवक काँग्रेसने केलेल्या निदर्शनांविरोधात भाजयुमोचं देशभर आंदोलन/ भिवंडी न्यायालयात आलेले राहुल गांधी यांचं काळ्या झेंड्यांनी स्वागत

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत सुपर एट गटाचे सामने आज पासून सुरु

**<><><><><>**

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं ट्रम्प यांनी जगभरातल्या देशांवर लादलेलं शुल्क असंवैधानिक असल्याचा निर्णय दिल्यानंतर, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जागतिक पातळीवर १० टक्के आयात शुल्क लागू करण्याचा आदेश जारी केला आहे. या आदेशावर ट्रम्प यांनी स्वाक्षरी केली असून, तो तातडीनं लागू होणार आहे. भारतासह जगभरातल्या इतर देशांसाठीही हा आदेश लागू असेल. या आदेशामुळे भारतावरचं आयात शुल्क तात्पुरत्या स्वरूपात १० टक्क्यांपर्यंत खाली येईल असा खुलासाही ट्रम्प यांच्या प्रशासनानं केला आहे.

**<><><><><>**

देशातून नक्षलवादाचं समूळ उच्चाटन येत्या ३१ मार्चपर्यंत करण्याचा पुनरुच्चार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा  आज गुवाहाटी इथं केला. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या ८७ व्या स्थापना दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी

पोलीस दलाच्या संचलनाचं निरीक्षण केलं. यावेळी त्यांनी सीआरपीएफच्या कार्याची प्रशंसा केली ते म्हणाले…

**होल्ड बाईट…**

**<><><><><>**

येत्या पाच वर्षांत भारत आणि ब्राझीलमधला द्विपक्षीय व्यापार २० अब्ज अमेरिकी डॉलरच्या पलीकडे जाईल असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुईझ इनासिओ लुला दा सिल्वा यांच्याबरोबर नवी दिल्ली इथं द्विपक्षीय चर्चा झाल्यानंतर दोन्ही नेत्यांनी संयुक्त निवेदन दिलं, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी भारत आणि ब्राझीलमध्ये डिजिटल भागीदारी, दुर्मीळ खनिजं, सूक्ष्म-लघु आणि मध्यम उद्योग तसंच नौवहन अशा क्षेत्रांशी संबंधित अनेक करार झाले.

त्याआधी आज सकाळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राध्यक्षांचं नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं समारंभपूर्वक स्वागत केलं.

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनीही त्यांची भेट घेतली.

**<><><><><>**

राष्ट्रीय बांबू महोत्सवाला आजपासून नागपूर इथं प्रारंभ होत आहे. येत्या २७ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवाचं उद्घाटन आज सायंकाळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार आहे. महोत्सवातल्या “बॅम्बू बीट्स अँड बिर्याणी” या उद्घाटन सोहळ्यात बांबू ऑर्केस्ट्रा आणि बांबू फूड शो सादर केला जाणार आहे. या महोत्सवात बांबूचा वापर करुन बांधकाम, उत्पादन डिझाईन, दागिने निर्मिती अशा विविध कार्यशाळांचं आयोजन करण्यात आलं आहे. तसंच शाश्वत बांबू शेती, कार्बन ऑफसेट आणि पाच दिवसांचा प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यक्रमही होणार आहे. या महोत्सवात २५ तारखेला शेतभेट कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून बांबू शेतीचं प्रात्यक्षिक दाखवलं जाणार आहे.

<><><><><>

राज्यात एस आय आर म्हणजेच निवडणूक याद्यांचं विशेष सखोल पुनरिक्षण येत्या एप्रिलमध्ये सुरू होणार असून या माध्यमातून अचूक आणि पारदर्शक मतदार याद्या निर्माण होतील. यासाठी आवश्यक तो सर्व निधी राज्य सरकार देईल अशी माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ते काल नागपूरमध्ये महसूल क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांच्या उद्घाटनप्रसंगी प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

<><><><><>

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची स्वतंत्र चौकशी करावी आणि नागरी उड्डाण मंत्री के. राममोहन नायडू यांना पदावरुन हटवावं, अशी मागणी करणारं पत्र आमदार रोहित पवार यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना लिहिलं आहे. अपघातग्रस्त विमान ज्या कंपनीचं होतं, त्या व्हीएसआर कंपनीचा नायडू यांच्या पक्षाशी घनिष्ट संबंध असल्याचा आरोप पवार यांनी केला आहे. या पत्राची एक प्रत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनाही देण्यात आली आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या, आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रम श्रृंखलेचा १३१ वा भाग असेल. सकाळी ११ वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, तसंच न्यूज ऑन ए आय आर ॲप वरुन ऐकता येईल.

<><><><><>

नवी दिल्लीत आयोजित एआय इंपॅक्ट परिषदेत तंत्रज्ञानातल्या वेगवेगळ्या अडचणींवरचे उपाय मांडण्यात आल्याचं केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. वैष्णव यांनी आज सकाळी भारत मंडपम् इथं जाऊन सहभागी नवोन्मेषकर्मींबरोबर संवाद साधला. प्रदर्शनस्थळी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी काल निदर्शनं करीत गदारोळ केल्याप्रकरणी ते म्हणाले, की काँग्रेस अतिशय हीन

दर्जाचं राजकारण करत असून ही त्या पक्षासाठी लाजिरवाणी बाब आहे. काँग्रेस युवाविरोधी आणि नवोन्मेष विरोधी असल्याचा आरोप त्यांनी केला.

काँग्रेसच्या कालच्या कृतीमुळे सारा देश शोकसंतप्त असल्याचं भाजपा प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी यांनी पत्रकारपरिषदेत सांगितलं. काँग्रेस देशाचा अपमान करत असल्याचा आरोप त्यांनी केला. भारत मंडपम् इथं एआय इंपॅक्ट परिषदेत युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी निदर्शनं केल्याच्या निषेधात भारतीय जनता पार्टीच्या युवा मोर्चाने आज देशभरात निदर्शनं केली.

**<><><><><>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्याने दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यासाठी काँग्रेस नेते राहुल गांधी आज ठाणे जिल्ह्यातल्या दंडाधिकारी न्यायालयासमोर हजर झाले. २०१४च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान प्रचार सभेत राहुल गांधी यांनी संघाबाबत केलेल्या वक्तव्याबद्दल दाखल झालेल्या खटल्यात माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील जामीन होते. मात्र, गेल्या वर्षी त्यांचं निधन झाल्यामुळे नवा जामीन सादर करण्याचे निर्देश भिवंडी दंडाधिकारी न्यायालयाने दिले. त्यानुसार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जामीन म्हणून अर्ज दिला.

राहुल गांधी यांनी आज मुंबईत पक्षाच्या कार्यकर्त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी महापालिका निवडणुकीतल्या पक्षाच्या कामगिरीचा तसंच राज्यात काँग्रेस पक्षाचं स्थान मजबूत करण्यासाठीच्या प्रयत्नांविषयीचा आढावा घेतला.

दरम्यान, एआय इम्पॅक्ट समिटमधल्या काँग्रेसच्या निषेधाला प्रत्युत्तर म्हणून भाजप कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांना काळे झेंडे दाखवले.

**<><><><><>**

परळी वैजनाथ इथं झालेल्या महा पशुधन प्रदर्शनात पुण्यातल्या कृषी महाविद्यालयाच्या देशी गाय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राला महाराष्ट्र गोसेवा

आयोगाचा शुद्ध देशी गोवंश सन्मान योजना पुरस्कार देण्यात आला. महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी हा पुरस्कार प्रदान केला. देशी गोवंश जतन, संवर्धन, संशोधन, प्रशिक्षण आणि शेतकरी मार्गदर्शन या क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल हा पुरस्कार दिला जातो.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांच्यावर दाखल केलेला मानहानीचा खटला राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी मागे घेतला आहे. गिरणा साखर कारखान्याच्या भागधारकाकडून जमा केलेल्या १७८ कोटी रुपयांच्या अपहाराचा आरोप राऊत यांनी मंत्री भुसे यांच्यावर केला होता. आपल्याविरुद्ध चुकीचे आरोप केल्याचा दावा करत भुसे यांनी राऊत यांच्याविरुद्ध हा खटला दाखल केला होता. मालेगाव इथल्या न्यायालयात आज झालेल्या सुनावणीत राऊत यांनी आपल्याला चुकीची माहिती मिळाल्याचं मान्य केलं. तर राऊत यांनी आपले शब्द मागे घ्यावेत या अपेक्षेतूनच हा खटला दाखल केल्याचं दादा भुसे यांनी न्यायालयाला सांगितलं. त्यामुळे हा खटला मागे घेत असल्याची घोषणा भुसे यांनी केली.

**<><><><><>**

नंदुरबार जिल्ह्यातलं थंड हवेचं ठिकाण तोरणमाळ इथे पहिल्या तोरणमाळ फेस्टीवलला कालपासून सुरवात झाली. तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात पर्यटकांना आदिवासी संस्कृती, बोलीभाषा आणि परंपराचं दर्शन घडणार आहे. आमदार आमश्या पाडवी, जिल्हाधिकारी यांनी पारंपारिक आदिवासी वाद्य आपल्या हाताने वाजवत या महोत्सवला सुरवात केली. या महोत्सवात सर्व वस्तूंमध्ये बांबूचा वापर करण्यात आला आहे.

**<><><><><>**

मुंबईत लवकरच नवीन, अधिक सुरक्षित, अधिक स्मार्ट आणि संपूर्णपणे स्वदेशी वेगवान मोनोरेल पुन्हा सुरु होणार आहे. मोनोरेलला आपल्या नवीन रोलिंग स्टॉक आणि सीबीटीसी आधारित सिग्नलिंग प्रणालीसाठी आवश्यक सुरक्षा प्रमाणपत्र मिळालं आहे. आता पुढील प्रक्रिया लवकरच पूर्ण होण्याची अपेक्षा असून त्यानंतर नवीन आणि सुधारित अद्ययावत मोनोरेल पुन्हा मुंबईकरांच्या सेवेत दाखल होईल.

<><><><><>

टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सुपर एट गटाचे सामने आज पासून सुरु होत आहेत. पहिला सामना पाकिस्तान आणि न्यूझीलंड दरम्यान कोलंबो इथं होईल. सामना संध्याकाळी ७ वाजता सुरु होईल.

भारत, वेस्ट इंडीज, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड,श्रीलंका, न्यूझीलंड, झिंबाब्वे, आणि पाकिस्तान हे देश सुपर एटमधे पोहोचले आहेत. भारताचा सामना उद्या दक्षिण आफ्रिकेबरोबर अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर होणार आहे.

<><><><><>

ऑपरेशन सिंदूर' मधे विशेष उल्लेखनीय कामगिरी बजावल्याबद्दल महाराष्ट्र सदनचे गुंतवणूक निवासी आयुक्त  सुशील गायकवाड यांना भारतीय लष्कर प्रमुखांचे प्रशंसा पदक मिळालं आहे. संरक्षण मंत्रालयाच्या  ऑपरेशन आणि लॉजिस्टिक्स संचालनालयात कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत असताना २०२५ मधे या मोहिमेत त्यांनी दळणवळण व्यवस्थापनात महत्त्वाची कामगिरी बजावली होती.  नवी दिल्लीत  संरक्षण मंत्रालयात आयोजित सोहळ्यात लष्कर उपप्रमुख लेफ्टनंट जनरल पुष्पेंद्र सिंह यांच्या हस्ते पदक प्रदान करण्यात आलं.

<><><><><>

कर्नाटकात बागलकोट जिल्ह्यात आज पहाटे झालेल्या अपघातात चौघांचा मृत्यू झाला असून इतर ८ जण जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. महाराष्ट्रातल्या ऊसतोडणी मजूरांना

घेऊन जाणारं वाहन आज पहाटे बागलकोट जिल्ह्यातल्या जमखडी तालुक्यातल्या कट्टेकेरे इथं अचानक उलटून हा अपघात झाला. हे सर्व मजूर ऊसतोडणीसाठी जमखंडी परिसरात गेले होते.

//<><><><><>//